**कृपया प्रसिध्दीसाठी** **10 डिसेंबर 2012**

**मुंबईच्या रेल्वे समस्या ऐकण्यासाठी**
**रेल्वे मंत्र्यांचे राम नाईक यांना मुंबईला येण्याचे आश्वासन**

**मुंबई, सोमवारः** मुंबईतील उपनगरी रेल्वे प्रवाश्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी मुंबईला भेट देण्याचे आश्वासन रेल्वे मंत्री श्री. पवन कुमार बन्सल यांनी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांना दिले. मुंबईतील रेल्वे समस्यांबाबत श्री.नाईक यांनी रविवारी दिल्लीत रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यावेळी हे आश्वासन देण्यात आले.

दीर्घकाळ रेंगाळलेले मुंबईतील रेल्वे प्रकल्प त्वरेने पूर्ण करण्यासाठी निदान येत्या रेल्वे अर्थ संकल्पात मुंबईसाठी किमान रु.1,000 कोटींची तरतूद ठेवावी, अशी विनंती यावेळी श्री. राम नाईक यांनी केली. याआधीच्या रेल्वे मंत्र्यांनी रेल्वे अर्थ संकल्प सादर करताना या वर्षभरात मुंबईतील रेल्वे स्थानकांवर 50 सरकते जिने तयार करण्याची घोषणा केली होती, मात्र त्या कामासाठी अवघ्या 20 लाख रुपयांची तजवीज केली होती याकडेही श्री. राम नाईक यांनी रेल्वे मंत्र्यांचे लक्ष वेधून सत्य परिस्थितीची विचारणा केली.

विरार-डहाणू मार्गाचे रुंदीकरण झाले, डीसीचे एसी झाले, तरीही अजून चर्चगेट-डहाणू रेल्वे सुरु न झाल्याने प्रवाशांत प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे याची श्री. राम नाईक यांनी रेल्वे मंत्र्यांना स्पष्ट जाणीव करुन दिली. या असंतोषाच्या उद्रेकाची वाट न पाहाता आता तात्काळ चर्चगेट-डहाणू थेट गाड्या सुरु करण्याची मागणी श्री. राम नाईक यांनी केली.

गर्दीला निदान तात्पुरता दिलासा म्हणून अगोदर सर्व 9 डब्यांच्या गाड्या 12 डब्यांच्या कराव्यात व त्यानंतर सर्वच गाड्या 15 डब्यांच्या करण्यात याव्यात, सध्याची गर्दी कमी करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे, असे स्पष्ट प्रतिपादन यावेळी श्री. नाईक यांनी केले. डीसीचे एसी झाल्याने गाड्यांचा वेग 25 टक्क्यांनी वाढविता येणे शक्य आहे. त्यासाठी पश्चिम रेल्वेचे नवे वेळापत्रक करुन वेग वाढवावा अशी मागणीही यावेळी श्री. राम नाईक यांनी केली.

उन्नत रेल्वे मार्गाची योजना आणण्याआधी मुंबईच्या रेल्वे प्रवाशांना विश्वासात घेऊन त्यांची मते जाणून घ्या, प्रवासी संघटनांशी चर्चा करा, त्यासाठी प्रत्यक्ष मुंबईत या असेही श्री.नाईक यांनी यावेळी रेल्वे मंत्र्यांना सुचविले. मुंबईकर रेल्वे प्रवाशांची आपली उपेक्षा केली जाते अशी भावना आहे. मुंबईतील सुरु असलेल्या सर्व प्रकल्पांची, योजनांची अद्ययावत माहिती देणारी श्वेतपत्रिका प्रसिद्ध करा अशी मागणीही यावेळी श्री. राम नाईक यांनी रेल्वे मंत्री श्री. पवन कुमार बन्सल यांच्याकडे केली.

श्री. नाईक यांच्या सर्व मागण्यांवर विचार करु आणि मुंबईच्या उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी मुंबईत येऊ, असे आश्वासन रेल्वे मंत्री श्री. बन्सल यांनी यावेळी दिले.

**(कार्यालय सचिव)**